RAJARAM COLLEGE, KOLHAPUR

DEPARTMENT OF BOTANY

# GREEN CORNER 2023-24

## PROJECT
## ECOFRIENDLY RAKSHA BANDHAN

**IN ASSOCIATION WITH**
**THE CONSERVATION FOUNDATION OF INDIA, KOLHAPUR**
**And**
**NEW POYTECHNIC COLLEGE, KOLHAPUR**

On the eve of Raksha Bandhan on 30th August 2023, an innovative program was organized by the Department of Botany, Rajaram College, Kolhapur. The Conservation Foundation of India (CFOI) and The New Polytechnic College, Kolhapur collaborated in organization of the program. Students made ecofriendly seed rakhis. The rakhis were exhibited and sold in the exhibition organized in the Botany Department on 22nd August 2023 from 10 to 5pm. ……….. number of students of B.Sc. I, II and III (Botany) participated enthusiastically in the exhibition. ………. Number of rakhis from various seeds (edible and wild) and degradable material were prepared by the students.

The program was organized to inculcate the awareness about celebration of festivals through ecofriendly initiatives. The activity inculcated skills among students to produce marketable products.

Another aspect of the program was to inculcate strong social values among students.600 rakhis were handed over to the Police department of Kolhapur Division in tribute of their valour and duty towards the safety of individuals and society as a whole.

The exhibition was inaugurated by Shri. Anil Tanpure, PI Rajarampuri Police station, Dr. Y.C. Attar, Principal, Rajaram College, Kolhapur, Mr. Ashish Ghevde, President, CFOI and Shri. Suhas Deshmukh, New Polytechnique, Kolhapur, members of CFOI, parents, staff of Rajaram College, Kolhapur and students. Members of organizing committee Dr. Umesh Jagtap, Dr. Anuradha Parale, Dr. Sunita Patil, Dr. Ketaki Patil, Mr. Yogesh Patil, Ms. Mrunalini Vedpathak, Mr. Sushant Bornak, Ms. Shivaranjini Sutar, Ms. Snehal Biranje were present.

पुण्य नगरी

# बीज राखी : निसर्ग अन् सण-संस्कृतीची उत्कृष्ट गुंफण

## राजाराम कॉलेजमध्ये भरले पर्यावरणपूरक राखी प्रदर्शन

कोल्हापूर : रक्षाबंधन हा सण बहीण-भावाचे नाते जपणारा म्हणून साजरा केला जातो; पण आता छत्रपती राजाराम कॉलेजच्या वतीने विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या बीज राखीतून केवळ बहीण-भाऊ यांचे नाते नव्हे, तर निसर्गासोबतचेही नाते जपले जाणार आहे. राजाराम कॉलेज वनस्पतीशास्त्र विभाग तसेच कॉन्झर्व्हेशन फाऊंडेशन ऑफ इंडिया, ग्रीन कॉर्नर, पॉलिटेक्निक यांच्या संयुक्त विद्यमाने राजाराम कॉलेजमध्ये बीज राखी प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. राजारामपुरी पोलीस ठाण्याचे निरीक्षक अनिल तनपुरे यांच्या हस्ते व प्राचार्य डॉक्टर वाय. सी. अत्तार यांच्या अध्यक्षतेखाली हे प्रदर्शन खुले झाले.

निसर्ग आणि आपली सण-संस्कृती यांचा खूप जवळचा संबंध आहे आणि हीच जोड राजाराम कॉलेजच्या वतीने रक्षाबंधन या सणाला देण्यात आली आहे. वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने



**राख्या सीमेवरील जवानांना पाठवण्यात येणार**
विद्यार्थिनींनी पो. नि. अनिल तनपुरे, तसेच फाऊंडेशनचे संस्थापक आशीष घेवडे यांना बीज राखी बांधून पर्यावरणपूरक रक्षाबंधनाची अनोखी सुरुवात केली. या प्रदर्शनातील राख्या विक्रीसाठी उपलब्ध असून, यापैकी काही राख्या सीमेवरील जवानांना पाठवण्यात येणार आहेत, अशी माहिती वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. अंजली पाटील यांनी दिली.

पर्यावरणपूरक रक्षाबंधन साजरे करण्यासाठी पुढाकार घेण्यात आला होता. विभागप्रमुख डॉ. अंजली पाटील यांनी सर्व विद्यार्थ्यांकडून बीज राखी बनवून घेण्याचा उपक्रम सुरू केला. गेल्या एक महिन्यापासून राजाराम कॉलेजच्या वनस्पतीशास्त्र विभागाचे विद्यार्थी विविध प्रकारच्या बीयांची नक्षीदार कल्पकता असलेल्या राख्या बनवण्यात मग्न झाले होते. रक्षाबंधनाचा सण एक आठवड्यावर आला आहे. सध्या सर्वत्र राखी खरेदीला गर्दी होत आहे. अशावेळी पर्यावरणपूरक असलेल्या या बीज राख्या नागरिकांनी खरेदी कराव्यात आणि रक्षाबंधन झाल्यानंतर या राख्या आपल्या शेतात किंवा कुंडीत, बागेमध्ये रुजवाव्यात, असे आवाहन कॉन्झर्व्हेशन फाऊंडेशन ऑफ इंडियाचे संस्थापक आशीष घेवडे यांनी विद्यार्थ्यांना केले.



प्राचार्य वाय. सी. अत्तार म्हणाल्या, महाविद्यालयीन जीवनामध्ये शिक्षणाबरोबरच समाजाला उपयुक्त ठरेल अशा पद्धतीचे विचार विद्यार्थ्यांनी अंगी बाणवले पाहिजेत. विद्यार्थ्यांच्या कृतीतून भविष्यात ते सुज्ञ नागरिक म्हणून समाजामध्ये जाणार आहेत. माजी राजारामियन्स म्हणून हे विद्यार्थी जेव्हा समाजामध्ये त्यांची ओळख सांगतील तेव्हा ती निश्चितच वेगळी ओळख असेल, यासाठी अशा प्रकारचे पर्यावरणपूरक उपक्रम विद्यार्थ्यांच्या विचारांना आणि कृतीला नक्कीच दिशादर्शक असतील. या पर्यावरणपूरक राख्या तयार करून राजाराम कॉलेजच्या वनस्पतीशास्त्र विभागाने निसर्ग आणि सण-संस्कृती यांची उत्कृष्ट गुंफण केली आहे.

पो. नि. अनिल तनपुरे म्हणाले, विद्यार्थ्यांनी बनवलेल्या या बीज राख्या खरोखरच पर्यावरणपूरक अशा आहेत. अशा पद्धतीने राखी पौर्णिमा साजरी होणार असेल तर नक्कीच मानव आणि निसर्ग भविष्यात अधिकाधिक जवळ येईल. यावेळी प्रा. डॉ. अनुराधा पराळे, डॉ. उमेश जगताप, डॉ. संजय, प्रा. योगेश मालचे-देशमुख यांच्यासह विद्यार्थी शिवरंजनी, स्नेहल, योगेश, सुशांत आणि मृणालिनी यांनी या उपक्रमासाठी विशेष संयोजन केले. या प्रदर्शनात विविध प्रकारच्या बीया वापरून तयार केलेल्या राख्या लक्षवेधी ठरत आहेत.

Kolhapur Edition
Aug 23, 2023 Page No. 9
Powered by : eReleGo.com

# सीडराखी उपक्रमातून पर्यावरण रक्षणाचा बोध

## अनिल तनपुरे; राजाराम महाविद्यालयात प्रदर्शनाचे उद्घाटन

कोल्हापूर, ता. २२ : प्लास्टिक व इतर वस्तूंच्या वापराने पर्यावरणाचा ऱ्हास होत असून, परदेशी वस्तूंचा वापर वाढल्याने तो पर्यावरणास हानिकारक ठरत आहे. या पार्श्वभूमीवर राजाराम महाविद्यालयाने घेतलेला पर्यावरणपूरक सीडराखी उपक्रम पर्यावरणपूरक असून, समाज त्याचा नक्कीच बोध घेईल, असे मत राजारामपुरी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक अनिल तनपुरे यांनी व्यक्त केले.



कोल्हापूर : पोलिस निरीक्षक अनिल तनपुरे यांना राजाराम महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी राखी बांधली. या वेळी डॉ. अंजली पाटील, आशिष घेवडे, प्राचार्या डॉ. यास्मीन अत्तार आदी उपस्थित होते. (छायाचित्र : प्रकाश पाटील)

राजाराम महाविद्यालय व दि. कॉन्झर्व्हेशन फाउंडेशन ऑफ इंडिया यांच्यातर्फे वनस्पतीशास्त्र विभाग येथे विद्यार्थ्यांनी बनविलेल्या सीडराखी प्रदर्शनाचे उद्घाटन तनपुरे यांच्या हस्ते झाले. या वेळी ते बोलत होते. यावेळी विद्यार्थिनींनी तनपुरे यांना राखी बांधून त्यांचे स्वागत केले. या वेळी वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. अंजली पाटील, प्रा. लाड, दि कॉन्झर्व्हेशनचे प्रेसिडेंट आशिष घेवडे, प्राचार्य डॉ. यास्मीन अत्तार आदी उपस्थित होते.

तनपुरे म्हणाले, "युवा पिढीने पर्यावरण वाचवण्याचे कार्य हाती घेऊन समाजात बदल घडवावा, यासाठी आम्ही आपल्याबरोबर आहोत." आशिष घेवडे म्हणाले, "अनेक वर्षांपासून पर्यावरणाशी निगडित घटकांचे संवर्धन करण्यासाठी संस्थेच्या माध्यमातून कार्य सुरू आहे. संस्थेच्या मदतीसाठी अनेकांचे सहकार्य लाभले आहे. आपण बनवलेल्या सीड राख्या पर्यावरणपूरक असल्याने विद्यार्थी आणि शिक्षकांचे कार्य कौतुकास्पद आहे." या वेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांनी बनवलेल्या पर्यावरणपूरक राख्यांच्या प्रदर्शनाची पाहणी केली.

### विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

महाविद्यालय व कॉन्झर्व्हेशन फाउंडेशनतर्फे भरविलेल्या राखी प्रदर्शनात रुकय्या मुल्ला, नेहा शिराळकर, वैष्णवी पाटील, धनश्री लांबडे, पल्लवी पाटील, स्नेहल पन्हाळकर, सायित्रा परडे, ऋतुजा पुरीबवार, रिचिल जाधव, प्रेरणा वरळकर यांच्या राख्या आकर्षक ठरल्या. या प्रदर्शनात सर्वच विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

लोकमत

# विद्यार्थ्यांनी सीड राख्या पोलिसांकडे केल्या सुपूर्द

## 'राजाराम'च्या विद्यार्थ्यांचा अनोखा उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : राजाराम महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी खास रक्षाबंधनानिमित्त सीड राख्या तयार केल्या आहेत.

दि कॉन्झर्वेशन फाउंडेशन ऑफ इंडिया यांच्या संकल्पनेतून या विद्यार्थ्यांनी सीड राख्या तयार केल्या आहेत. महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्र विभागाचा ग्रीन कॉर्नर आणि न्यू पॉलिटेक्निकच्या ग्रीन क्लबच्या विद्यार्थ्यांनी या पर्यावरणपूरक सीड राख्या बनवल्या आहेत. यातून पर्यावरण जतन करून आपले सण साजरे करण्याचा संदेश देण्यात आला आहे.

या राख्या वापरून झाल्यानंतर त्यातील बिया पेरता येतील. एका राखीतून एका वृक्षाचे संवर्धन करता येणार आहे. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या या राख्यांचे मंगळवारी महाविद्यालयात प्रदर्शन भरविण्यात आले होते. याचे उद्घाटन पोलिस निरीक्षक अनिल तनपुरे यांच्या हस्ते करण्यात आले. तनपुरे यांना राखी बांधून विद्यार्थिनींनी त्यांचे स्वागत केले.

यावेळी वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. अंजली पाटील, प्रा. लाड, दि कॉन्झर्वेशनचे प्रेसिडेंट आशिष घेवडे, प्राचार्य डॉ. यास्मिन अत्तार, आदी उपस्थित होते.

### पोलिसांनी केले विशेष कौतुक

या पर्यावरणपूरक राख्या विद्यार्थ्यांनी पोलिस दलातील आपल्या पोलिस बांधवांसाठी सन्मानाने सुपुर्द करण्यात आल्या. पोलिस निरीक्षक अनिल तनपुरे यांनी या राख्या स्वीकारल्या. या राख्यांचे त्यांनी विशेष कौतुक केले.

Hello Kolhapur Gramin
Page No. 4 Aug 23, 2023



कोल्हापूर : प्रदर्शन उद्घाटनप्रसंगी पोलीस निरीक्षक अनिल तनपूरे यांना राखी बांधताना विद्यार्थिनी. सोबत डॉ . अंजली पाटील, प्रा. लाड, आशिष घेवडे, डॉ यास्मीन अत्तार.

# राजाराम महाविद्यालयात सीड राख्यांचे प्रदर्शन

- पर्यावरणपूरक सीड राख्या पोलीस दलाकडे सुपुर्द

प्रतिनिधी

कोल्हापूर

राजाराम महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र, ग्रीन कॉर्नर व न्यू पॉलिटेक्निक यांच्या संयुक्त विद्यमाने सीड राख्या केल्या आहेत. या 'बीज राखी' प्रदर्शनाचे उद्घाटन राजारामपुरी पोलीस ठाण्याचे निरिक्षक अनिल तनपुरे यांच्या हस्ते केले. विद्यार्थिनींनी पोलीस निरिक्षक तनपुरे यांना सीड राखी बांधून स्वागत केले.

राजाराम कॉलेजमधील वनस्पतीशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक सीड राख्या तयार केल्या आहेत. पोलीस दलातील पोलीस बांधवांसाठी या राख्या देण्यात आल्या. सीड राख्यांचा अनोखा उपक्रम पाहून मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. या उपक्रमाचे नियोजन वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. अंजली पाटील, आशिष घेवडे, न्यू पॉलिटेक्निकचे सुहास देशमुख यांनी केले. या कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ. यास्मिन आत्तार व डॉ. संजय दाभोळे यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी डॉ. उमेश जगताप,



डॉ. अनुराधा पराळे, डॉ. सुनीता पाटील, डॉ. केतकी पाटील, योगेश पाटील, अविनाश देशमुख उपस्थित होते.

### विविध बियांपासून राखी

घरात वापरले जाणारे धने, कारळ, सुर्यफुल, करडे, जवस, तांदूळ, गहू, कडधाने आदी धान्यांपासून या राख्या बनवण्यात आल्या आहेत. आकर्षक राख्यांचे प्रदर्शन पाहण्यासाठी प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी गर्दी केली होती. आपल्या दररोजच्या वापरातील भाज्या, धान्य, कडधान्यापासून पर्यावरणपूरक राखी तयार करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश विद्यार्थ्यांनी दिला.